कोल्हापूर महानगरपालिकेने पुरविलेल्या सामाजिक सोयी सुविधांचे संख्यात्मक व गुणात्मक विश्लेषण (२००७-२०१७)

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड.

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

मानवविद्या विद्याशाखेंतर्गत अर्थशास्त्र विषयातील
विद्यावाचस्पती (पीएच.डी.) पदवीसाठी
सादर करण्यात आलेला संशोधन आराखडा

संशोधक

तटाळे पद्माकर बळीराम

अर्थशास्त्र विभाग

एम.ए., एम.फील

विठ्ठलराव पाटील महाविद्यालय कळे,

ता.पन्हाळा, जि.कोल्हापूर

मार्गदर्शक

प्रा. डॉ.डी. डी. माने

अर्थशास्त्र विभाग प्रमुख

एम.ए.एम फील, पीएच.डी.

शिवाजी महाविद्यालय, रेणापूर, जि.लातूर

कोल्हापूर महानगरपालिकेने पुरविलेल्या सामाजिक सोयी सुविधांचे संख्यात्मक व गुणात्मक विश्लेषण (२००७-२०१७)

प्रस्तावना

संशोधन कार्यास सुरुवात करण्यापुर्वी संशोधन विषयासंदर्भात माहितीचा ऊहापोह करणे अपेक्षित आहे. महानगरपालिका हा विषय नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेशी निगडित असल्यामुळे प्रथमतः स्थानिक स्वराज्य संस्था म्हणजे काय हे पाहणे गरजेचे आहे.

भारताच्या संदर्भात विचार करता प्राचीन काळापासून येथे स्थानिक स्वराज्य संस्थांचे अस्तित्व दिसून येते. मात्र ही संस्था जात व व्यक्तीगत वारसा या संकुचित आधारस्त्रोतावर आधारलेली होती. केवळ कर गोळा करणे आणि जनतेचे आणि जीविताचे संरक्षण करण्यापुरते त्याचे कार्य मर्यादित होते.

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भारत सरकारने सांघीक शासन प्रणालीचा स्वीकार केला. त्यात केंद्रस्थानी केंद्रसरकार, विविध राज्यस्तरावर राज्यसरकारे तसेच स्थानिक स्तरावर स्थानिक स्वराज्य संस्था कार्य करताना दिसतात. या विविध शासनाला आपआपल्या कार्यक्षेत्रात कार्य पार पाडण्यासाठी राज्यघटनेने आर्थिक उत्पन्नाची साधने दिलेली आहेत. केंद्रस्थानातील केंद्रसरकार बळकट करण्यासाठी राहण्यासाठी केंद्रसरकारला जास्त उत्पन्नाची साधने दिलेली आहेत तर राज्यसरकारला कमी महसूल प्राप्त होणारे उत्पन्नाची साधने दिलेली आहेत. यात सर्वात कमी महसूल प्राप्त होणारी साधने स्थानिक स्वराज्य संस्थेकडे असल्याचे दिसून येते. यामुळे स्थानिक स्वराज्य संस्थेला राज्यसरकारवरच अवलंबून रहावे लागते.

स्थानिक स्वराज्य संस्थेचे सर्वसाधारणपणे दोन भागात विभाजन करण्यात आले आहे. यात ग्रामीण स्तरावर कार्य करणाऱ्या संस्थेत जिल्हा परिषद, पंचायत समिती व ग्रामपंचायतीचा समावेश होतो तर नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेत अनुक्रमे महानगरपालिका, नगरपरिषद, नगरपंचायत, औद्योगिक नागरी, छावणी मंडळ, एकल उद्देशीय अभिकरण यांचा समावेश होतो.

राज्यघटनेच्या चौथ्या भागात राज्याच्या धोरणासंबंधी मार्गदर्शक तत्त्वे देण्यात आलेली आहेत. त्यापैकी राज्यघटनेच्या ४० व्या कलमात असे स्पष्टपणे म्हटलेले आहे की, स्थानिक

पातळीवर ग्रामपंचायती स्थापन करून त्यांना आवश्यक ते अधिकार देण्यात यावेत या तत्त्वाच्या आधारे राज्यांनी पंचायत राज्याची स्थापना केलेली आहे; परंतु १९९३ पर्यंत या स्थानिक स्वराज्य संस्थांना घटनात्मक दर्जा प्राप्त झालेला नव्हता. राज्यसरकारच्या नियंत्रणाखाली राहून या स्थानिक स्वराज्य संस्थेला आपला राज्यकारभार करावा लागत असे. तेव्हा स्थानिक स्वराज्य संस्थेला राजकीय व आर्थिकदृष्ट्या सक्षम बनविण्यासाठी त्यांना ज्यादा अधिकार देणे गरजेचे झाले. लोकांचा स्थानिक स्वराज्य संस्थेतील सहभाग वाढविण्यासाठी ह्यांना वैधानिक दर्जा प्राप्त करून देण्याची गरज निर्माण झाली व यातूनच तत्कालीन पंतप्रधान मा.पी.व्ही. नरसिंहराव यांच्या कारकिर्दीत सप्टेंबर १९९१ मध्ये लोकसभेत पंचायत राज्यासंबंधीचे विधेयक मांडले. या विधेयकास २२ डिसेंबर १९९२ रोजी लोकसभेने तर राज्यसभेने त्यास २३ डिसेंबर १९९२ रोजी मान्यता दिली व २० एप्रिल १९९३ रोजी राष्ट्रपतींची मंजूरी मिळाल्यानंतर पंचायत राज व्यवस्थेला घटनात्मक दर्जा प्राप्त झाला व २४ एप्रिल १९९३ पासून ह्या महत्त्वपूर्ण पंचायतराज कायद्याची अंमलबजावणी सुरू झाली.

७३ व्या व ७४ व्या घटनादुरूस्तीमुळे पंचायत राज प्रशासन व नागरी प्रशासन यामध्ये अनेक महत्त्वपूर्ण बदल घडून आले. स्थानिक स्वराज्यसंस्थेच्या निवडणूका, ग्रामसभा, पंचायत राज्यातील त्रिस्तरीय व विक्रेंद्रीत रचना, प्रतिनिधीत्व, आरक्षण, कार्यकाल, आर्थिक स्वायतत्ता, वित्तआयोग, कर आकारणी व वसुलीचे अधिकार, लेखापरिक्षण इत्यादीबाबत अनेक तरतुदी करण्यात आल्या व या तरतुदींचे पालन करणे राज्य सरकारांना बंधनकारक झालेले आहे. थोडक्यात राज्यातील ग्रामीण व नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना घटनात्मक दर्जा प्राप्त करून देण्याचे महत्त्वपूर्ण कार्य ७३ व्या व ७४ व्या घटनादुरूस्तीने केलेले आहे.

महाराष्ट्रातील महानगरपालिकेचा विचार करता सध्या महाराष्ट्रात २७ महानगरपालिका कार्य करताना दिसून येतात. यात अनुक्रमे बृहन्मुंबई, मिरा भायदर, ठाणे, नवी मुंबई, कल्याण-डोंबिवली, उल्हासनगर, भिवंडी-निझामपूर, वसई-विरार,पुणे, पिंपरी-चिंचवड, नागपूर, औरंगाबाद, नाशिक, अमरावती, सोलापूर, कोल्हापूर, सांगली-मिरज- कुपवाड, अहमदनगर, माळेगाव, जळगाव, धुळे, नांदेड-वाघाळा, लातूर, परभणी, अकोला, चंद्रपूर व पनवेल या महानगरपालिकांचा समावेश होतो.

अभ्यासविषयाच्या अनुषंगाने या २७ महानगरपालिकेपैकी कोल्हापूर महानगरपालिकेची संशोधनासाठी निवड केलेली आहे. कोल्हापूर महानगरपालिकेची स्थापना १९७२ मध्ये झालेली असून २०११ च्या जनगणनेनुसार या महानगरपालिकेच्या हद्दीतील लोकसंख्या ही ५,४९,२८३ इतकी असून सध्या या महानगरपालिकेत लोकांना सोयी सुविधा पुरवण्यात याव्यात यासाठी ८१ प्रभागाची निर्मिती केली असून येथे ८१ नगरसेवक कार्य करताना दिसून येतात.

संशोधन विषयाचे महत्त्व

सदर संशोधनासाठी कोल्हापूर महानगरपालिकेने सन २००७-०८ ते २०१६-१७ या दरम्यान मांडलेल्या अंदाजपत्रकाच्या आधारे तसेच प्राथमिक आधारसामुग्रीच्याआधारे महानगरपालिकेने आपल्या कार्यक्षेत्रातील नागरिकांना पुरविलेल्या सामाजिक सोयी व सुविधांचे (आरोग्य, शिक्षण, वाहतुक, पाणीपुरवठा) संख्यात्मक व गुणात्मक विश्लेषण केले जाणार आहे. अशा प्रकारचे संशोधन यापुर्वी झालेले नाही. उपल्बध व नवीन पायाभुत सोयी सुविधांचा दर्जा विकसित करणे साठी या संशोधनाचा उपयोग नक्कीच कोल्हापूर महानगरपालिकेला होईल. ज्यातून सामाजिक सोयी सुविधांची संख्यात्मक व गुणात्मक वाढ कोल्हापूर महानगरपालिकेला करता येईल.

संशोधनाची उद्दिष्टे

१) कोल्हापूर महानगर पालिकेचा ऐतिहासिक आढावा घेणे.

२) कोल्हापूर महानगरपालिकेच्या उत्पन्नाच्या स्त्रोताचा अभ्यास करणे.

३) कोल्हापूर महानगरपालिकेने पुरविलेल्या सामाजिक सोयी सुविधांवरील खर्चाचा अभ्यास व खर्चाचे विश्लेषण करणे.

४) शासनाने पुरवलेल्या वित्त पुरवठा / फंडाचा अभ्यास करणे.

५) सामाजिक सोयी सुविधांचे मापन करणे.

संशोधनाचे गृहितकृत्य

१) कोल्हापूर महानगरपालिकेच्या सामाजिक सोयी सुविधांवरील खर्चात वाढ होत आहे. त्यामुळे त्यात संख्यात्मक व गुणात्मक वाढ होत आहे.

२) महानगरपालिकेच्या परिक्षेत्रात सोयी सुविधामध्ये असमतोल दिसून येतो.

३) शासनाकडून होणारा वित्त पुरवठा हा पुरेशा प्रमाणत होत नाही .

तथ्यसंकलन

सदर संशोधनासाठी प्रामुख्याने प्राथमिक व दुय्यम आधारसामुग्रीचा वापर करण्यात येणार आहे. यात कोल्हापूर महानगरपालिकेच्या एकूण ८१ नगरसेवकातून हेतू परस्पर पध्दतीने २०% नगरसेवकाची निवड केली जाईल त्यामधून महानगरपालिकेतील १०% महिला व १०% पुरुष नगरसेवकाची निर्हेतूक पध्दतीने निवड करुन त्यांच्याकडून संशोधनासाठी आवश्यक असणारी माहिती संकलित केली जाईल.या २०% प्रभागातील निर्हेतूक पध्दतीने १० पुरुष १० महिला नागरिकाचे निवड करुन प्रश्नावली/अनुसूची माध्यमातून प्राथमिक आधार सामुग्री गोळा करण्यात येईल एवढेच नव्हे तर महानगरपालिकेच्या आरोग्य, शिक्षण, वाहतूक व पाणी पुरवठा या विभागातील प्रमुखांच्या मुलाखतीद्वारे तथ्यसंकलन करून विश्लेषण करण्यात येणार आहे. द्वितीय आधारसामुग्रीमध्ये कोल्हापूर महानगरपालिकेचे मागील दहा वर्षातील (सन २००७-०८ ते सन २०१६-१७)अर्थसंकल्प व इतर साधनसामुग्रीचा आधार घेण्यात येणार आहे.

संशोधनाची व्याप्ती व मर्यादा

सदर संशोधन हे केवळ कोल्हापूर महानगरपालिका हद्दीपुरतेच असेल. तसेच यात केवळ सन २००७-०८ ते २०१६-१७ या दहा वर्षाच्या कालखंडाचा विचार करण्यात येणार आहे व कोल्हापूर महानगरपालिकेने पुरविलेल्या शिक्षण, आरोग्य, वाहतूक व पाणी या सामाजिक सोयी सुविधांचे संख्यात्मक व गुणात्मक विश्लेषण केले जाणार आहे.

प्रकरण आराखडा

१) प्रस्तावना व संशोधन क्षेत्राचे वर्णन / रुपरेषा

२) पूर्व संशोधनाचे अवलोकन

३) संशोधन पद्धती

४) कोल्हापूर महानगरपालिकेच्या उत्पन्नाचा अभ्यास

५) सामाजिक सोयी सुविधांचे संख्यात्मक व गुणात्मक विश्लेषण

६) निष्कर्ष व शिफारशी

संदर्भसूची

१) आगलावे प्रदिप, *सामाजिक संशोधन पद्धती*, विद्या प्रकाशन, नागपूर, २००७.

२) कुंभोजकर ग. दि., *संशोधन पद्धती व संख्याशास्त्र*, फडके बुक सेलर्स, कोल्हापूर, १९८३

३) यमलवाड गोविंद, *स्थानिक स्वराज्य संस्था*, कल्पना प्रकाशन, नांदेड, २००१

४) भोगले शांताराम, *भारतातील स्थानिक शासन*, विद्या प्रकाशन, नागपूर, १९७६

५) शिंदे ज. रा., *नागरिकशास्त्र आणि भारतातील घटकराज्याची शासनव्यवस्था,* आदर्श प्रकाशन, लातूर.

६) के. सागर, *असा हा महाराष्ट्र*, सागर पब्लिकेशन, औरंगाबाद, १९९८

७) महेश्वरी एस. आर., *भारत मे स्थानिय शासन*, अग्रवाल प्रकाशन, आग्रा, २००८.

८) Bhat K.S., *Panchayat Raj Administration in Maharashtra*, १९७४.

९) Sharma M. P., *Local Self Government in India*, Munshiram Manoharlal Publisher, १९७७.

१०) Goel S. L., *Urban Local Self Government*, Deep and Deep Publication, २०११.

११) Shukla N. P., *Local Self Government in India*, Navyug Books, २०११.

संशोधक

तटाळे पद्माकर बळीराम
एम.ए., एम.फील
सहाय्यक प्राध्यापक,
विठ्ठलराव पाटील महाविद्यालय कळे,
ता.पन्हाळा, जि.कोल्हापूर

मार्गदर्शक

डॉ. डी. डी. माने
एम.ए.एम फील , पीएच.डी.
सहयोगी प्राध्यापक,
शिवाजी महाविद्यालय, रेणापूर, जि.लातूर